# डॉ. मुंजे आयइटी लोकल नेटवर्कच्या अध्यक्षपदी

## अभियांत्रिकी क्षेत्रातील नामांकित आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संघटना

**नाशिक : वार्ताहर**

लंडनमधील इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजी (आयइटी) ही अभियांत्रिकी क्षेत्रातील एक नामांकित आंतरराष्ट्रीय व्यावसायिक संघटना आहे. यावर्षी ही संघटना १५० वर्षे पूर्ण करणार आहे. भारतात बंगळूरु येथे संघटनेचे मुख्य कार्यालय असून त्या व्यतिरिक्त भारतात अन्य सात ठिकाणी लोकल नेटवर्क आहेत. त्यापैकी नाशिक येथील एक लोकल नेटवर्कच्या अध्यक्षपदी डॉ. रवींद्र मुंजे यांची निवड झाली.



डॉ. मुंजे हे के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण व संशोधन संस्थेमधील विद्युत अभियांत्रिकी विभागात कार्यरत आहे. लोकल नेटवर्कच्या कार्यक्षेत्रामध्ये नाशिक, अहमदनगर आणि औरंगाबाद यांचा समावेश होतो. प्रा. डॉ. मुंजे यांच्या या निवडीबद्दल आयईटी नाशिक लोकल नेटवर्कचे माजी अध्यक्ष डॉ. कुशारे, प्राचार्य डॉ. नांदुरकर, संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, विश्वस्त समीर वाघ व सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी डॉ. मुंजे यांचे अभिनंदन केले.

**11-02-20121,**
**Gavakari**

# 'आत्मनिर्भर होण्यासाठी स्वदेशी पुस्तके वाचा'

## अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या महाविद्यालयांना सूचना

**रसिका मुळये, लोकसत्ता**

**मुंबई :** 'आत्मनिर्भर' होण्यासाठी आता परदेशी लेखक, संशोधकांचे केंद्रीय शिक्षण मंत्रालयाला वावडे असल्याचे दिसत आहे. अभियांत्रिकी विद्याशाखेचा अभ्यास हा भारतीय लेखक आणि प्रकाशकांच्या पुस्तकावरूनच करण्यात यावा, अशा सूचना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने (एआयसीटीई) महाविद्यालयांना दिल्या आहेत.

तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठी परदेशी लेखक, संशोधकांची पुस्तके वापरण्याकडे विद्यार्थ्यांचा कल असतो. अनेक सिद्धांतांवरील मूलभूत संशोधनही परदेशी झाले आहे. मात्र भारतातील भावी अभियंत्यांना 'आत्मनिर्भर' होण्यासाठी भारतीय लेखकांचीच पुस्तके अभ्यासावी लागणार आहेत. परिषदेने महाविद्यालयांना भारतीय लेखकांची पुस्तके *(पान २ वर)*

### परिषदेची भूमिका...

'विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी भारतीय लेखक आणि प्रकाशकांची पुस्तके वापरावीत, जेणेकरून ही पुस्तके आणि लेखकांचा जागतिक स्तरावर प्रसार होईल. त्याचप्रमाणे आत्मनिर्भर भारत निर्माण होण्याच्या दृष्टीने हे महत्त्वाचे पाऊल ठरेल. भारतीय लेखक आणि प्रकाशकांची पुस्तके वापरण्याची सूचना देऊन 'आत्मनिर्भर भारत' अभियानात आपले योगदान द्या,' अशा आशयाचे पत्र परिषदेने महाविद्यालयांना पाठवले आहे.

### मोजक्याच पुस्तकांचे पर्याय...



परिषदेने दोन वर्षांपूर्वी जाहीर केलेल्या भारतीय लेखक आणि प्रकाशकांच्या पुस्तकांच्या यादीमध्ये प्रत्येक विषयासाठी दोन किंवा तीनच पुस्तकांचे पर्याय देण्यात आले आहेत. त्यातही काही पुस्तकांचे सहलेखक परदेशी आहेत, तर काही पुस्तकांचे प्रकाशक परदेशी आहेत. त्यामुळे भारतीय पुस्तकेच वापरायची झाल्यास विद्यार्थ्यांसाठी अगदी मोजकेच पर्याय उपलब्ध असणार आहेत.

लोकसत्ता Thu, 11 February 2021
https://epaper.loksatta.com/c/58367315

# वाघ अभियांत्रिकीचा इंडक्शन कार्यक्रम

**नाशिक** : भविष्यात विद्यार्थ्यांनी व्यावसायिक व वैयक्तिक जीवनात कुठले गुण आत्मसात करावे. तसेच विद्यार्थांनी स्वतः समोर एक आदर्श ठेऊन स्वतःला कायम प्रेरित केले पाहिजे. त्याचप्रमाणे विद्यार्थांनी प्रश्न सोडवण्याचे कौशल्य आत्मसात करावे, असे प्रतिपादन राजन भंडारे यांनी केले. कर्मवीर काकासाहेब वाघ अभियांत्रिकी व संशोधन संस्थेतील एम.बी.ए. विभागाच्या प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा इंडक्शन कार्यक्रम सोमवार, दि. १ फेब्रुवारी २०२१ रोजी पार पडला.यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतेवेळी कोसो इंडिया कंपनीचे जनरल मॅनेजर राजन भंडारे मार्गदर्शन करत होते. याप्रसंगी .मॅकेनिकल विभागाचे विभागप्रमुख प्रा. मिलिंद मुरुगकर, डॉ. अजिंक्य जोशी, डॉ सरोज ढाके आणि निवडक विद्यार्शी उपस्थित होते.

Nashik Edition
Feb 8, 2021 Page No.
Powered by : eReleGo.com

# कौशल्ये आत्मसात करा

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

## राजन भंडारे यांचा विद्यार्थ्यांना सल्ला




विद्यार्थ्यांनी स्वतः समोर एक आदर्श ठेवून स्वतःला नेहमी प्रेरीत करायला हवे. तसेच विद्यार्थ्यांनी सध्याच्या काळात आवश्यक असणारी विविध कौशल्ये आत्मसात करावीत, असा सल्ला कोसो इंडिया प्रा. लि. चे जनरल मॅनेजर राजन भंडारे यांनी विद्यार्थ्यांना दिला. के. के. वाघ कॉलेजमधील एमबीए पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित इंडक्शन कार्यक्रमात ते बोलत होते.

भंडारे यांनी यावेळी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. तसेच भावी व्यवस्थापकांकडून कॉर्पोरेट क्षेत्राच्या काय अपेक्षा आहेत, याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. आयुष्यात येणाऱ्या प्रश्नांपासून दूर न पळता त्यांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न विद्यार्थ्यांनी करायला हवा. आजच्या जगात कौशल्यांना महत्त्व आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्या विकासाला प्राधान्य द्यायला हवे. जनसंपर्क वाढविणे ही सुद्धा काळाची गरज आहे, असे भंडारे यांनी सांगितले.

एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रभारी विभागप्रमुख डॉ. सरोज ढाके यांनी विभागाबद्दल तसेच विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांबाबत माहिती दिली. यावेळी विभागातील प्राध्यापक डॉ. शाल्मली गदगे, मेकॅनिकल विभागाचे प्रमुख प्रा. मुरुगकर, प्रभारी कुलसचिव डॉ. अजिंक्य जोशी तसेच अन्य प्राध्यापक उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष बाळासाहेब वाघ, कॉलेजचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम झाला.

K. K. Wagh Education Society's

# K. K. Wagh Institute of Engineering Education & Research

Haribai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, NASHIK - 03

Website : www.engg.kkwagh.edu.in Contact : 0253-2221310

**(8 Courses accredited by NBA, NAAC "A" Grade Institute)**

**PLATINUM CATEGORY Institutes as per AICTE-CII Survey**

## ADMISSION TO - First Year Engineering, - ME, MBA & MCA Direct Second Year Engineering 2020-21

## INSTITUTE LEVEL ADMISSIONS & AGAINST CAP VACANT SEATS

Few seats are available in the First Year & direct Second Year of Engineering, MCA, MBA & M.E. courses. Eligible & aspiring candidates may contact admission centre at the institute. All matters related to admission will be handled by Institute Level Admission Committee.

Contact No. : 0253-2221310/ 7888045550.

**(Dr. K. N. Nandurkar)**
Principal

Advt. No. : 18/2021, dtd. 01/02/2021

लोकमत


K.K. Wagh Education Society's

# K. K. Wagh Institute of Engineering Education & Research

Hirabai Haridas Vidyanagari, Amrutdham, Panchavati, NASHIK-03.
Website : www.engg.kkwagh.edu.in **Contact** 0253-2221310
**(8 Courses accredited by NBA, NAAC "A" grade Institute
PLATINUM CATEGORY Institutes as per AICTE-CII Survey)**

## ADMISSION TO - First Year Engineering
## - ME, MBA & MCA
## - Direct Second Year Engineering 2020-21

## INSTITUTE LEVEL ADMISSIONS & AGAINST CAP VACANT SEATS

Few seats are available in the First Year & direct Second Year of Engineering, MCA, MBA & M.E. courses. Eligible & aspiring candidates may contact admission centre at the institute. All matters related to admission will be handled by Institute Level Admission Committee.

**Contact No. : 0253-2221310 / 7888045550**

**(Dr. K. N. Nandurkar)**
**Principal**

Advt.No.: 17/2021. dtd 01/02/2021


Nashik Main
Page No. 7 Feb 02, 2021
Powered by: erelego.com